# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेस नोट ता.१५/१०/२०२०

## चिखली येथुने लोखंडी स्टीलने भरलेला ट्रक चोरी करणाया इसमांना अटक, किं.११,६६,७७७/- रूपायांचा मुद्देमाल हस्तगत पिंपरी चिंचवड, गुन्हे शाखा, युनिट १ ची कारवाई

दि.१२/१०/२०२० रोजी इसम नामे समाधान नवनाथ खरात,रा.चिखली, पुणे याचे ट्रक ड्रायव्हर विकास राजुरकर याने जालना येथुन ट्रकमध्ये २३ टन लोखंडी स्टील किंमती ९,७८,७७७/- रू चे भरून आणुन दि.१२/१०/२०२० रोजी सायंकाळी ०५.०० वा. चे सुमरास हरगुडे वस्ती, चिखली येथे लावुन घरी गेले होता सदर माल रावेत येथे साईटवर टाकायचा होता ती ट्रक कोणीतरी अज्ञात चोरट्याने लबाडीचे इराद्याने चोरून नेला होता. त्याबाबत गाडीचे मालक यांनी दिलेल्या फिर्यादी वरून चिखली पोलीस ठाणे येथे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्ह्याचा समांतर तपास मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट १ कडील सपोनि गणेश पाटील व ८ कर्मचारी यांचे दोन पथके तयार करून घटनास्थळास भेट देवुन घटनास्थळापासुन ते देहु आळंदी रोड, मरकळ, पेरणेफाटा, शिक्रापुर फाटा असे साधारण ३० ते ४० सी.सी.टिव्ही कॅमेरे चेक केले. तसेच रोडवरील पेट्रोल पंप, ट्राफीक पोलीस, भंगाराची दुकाने, रांजणगाव एम.आय.डी.सी. परीसर अशा विविध ठिकाणी शोध घेतला. कारेगाव केडगाव दौंडरोडवर एक लोखंडाने भरलेला ट्रक एका हॉटेलचे समोर लावला असल्याची माहिती **पोलीस शिपाई विजय मोरे** यांना मिळाली. त्यावरून सदर रोडवर मयुर हॉटेल येथे जावुन हॉटेलचे समोर एक ट्रक मिळुन आला. सदरचा ट्रक हा वरील गुन्ह्यातील असल्याचे निष्पन्न झाले. त्याबाबत आजुबाजुच्या लोकांकडे विचरपुस करून ट्रकचे केबीनमध्ये बसलेला **शशीकांत आजिनाथ माने, वय ३५ वर्षे, रा. मोरेवस्ती, चिखली, पुणे हा मिळुन आला** त्याचेकडे सखोल चौकशी केली असता त्याने सदरचा ट्रक चोरून आणला असल्याचे सांगुन मुळ ड्रायव्हर राजुरकर याने ट्रक चोरून घेवुन जाण्यास सांगितले होते. त्यावरून ट्रक चालक **विकास राजुरकर, वय ४२ वर्षे,** यास ताब्यात घेण्यात आले. दोन्ही संशयीत इसमांकडे एकत्रित तपास करता त्यांनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना गुन्ह्यामध्ये अटक करण्यात आली आहे. आरोपीकडुन **ट्रक व त्यातील लोंखडी स्टील असा ११,६६,७७७/- रूपयांचा** मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपींची दि.१८/१०/२०२० रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मिळाली आहे.

दोन्ही आरोपी हे एकमेकांचे मित्र असुन ते जवळ जवळ राहतात.आरोपी विकास राजुरकर हा दि.१२/१०/२०२० रोजी गाडीमध्ये स्टील भरण्यासाठी जालना येथे गेला होता तेव्हा शशीकांत माने याच्याशी भेट झाली व जालना येथुन पुण्याकडे येत असताना ट्रक व त्यामधिल लोंखडी स्टील चोरी करण्याचा प्लॅन झाला होता.माने यांना १५ हजार **भिशीचे** भरायचे होते. दोघांनी जालना जवळ गाडीतील काही स्टील विकुन रोडने दारू पिली. त्यानंतर आरोपी विकास राजुरकर हा ठरल्या नुसार ट्रक लावुन घरी निघुन गेला व आरोपी शशीकांत माने हा पहाटेच्या वेळी ट्रक चोरी करून घेवुन गेला असल्याचे उघड झाले आहे. शशीकांत माने हा मुळचा जामखेडचा असुन ५ वर्षा पासुन तो **ठाणे एस.टी. महामंडळामध्ये ड्रायव्हर म्हणुन नोकरीस आहे.** लॉकडाऊन पासुन तो कामावर जात नव्हता. भिशीचे पैसे भरणे व घर खर्चासाठी पैसे लागत असल्याने त्यांनी वरील प्रमाणे दोघांनी प्लॅन केला होता. गाडी चोरी

केल्यानंतर डिझेल भरण्यासाठी पैसे नसल्याने विकास राजुरकर हा दुपारपर्यंत पसै घेवुन जाणार होता असे निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री कृष्ण प्रकाश, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री सुधिर हिरेमठ, सहा.पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री.आर.आर.पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे, सहा.पोलीस निरीक्षक गणेश पाटील, सपोफौ रविंद्र गावंडे, सुभाष सावंत, पोलीस कर्मचारी पोना मारूती जायभाये, अजंनराव सोडगिर, विजय मोरे, सचिन मोरे, प्रमोद गर्जे, यांचे पथकाने केली आहे.